!! श्री !!

# साईकृपा को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.

नोंदणी क्रमांक : एनबिओएम/सिडको/एचएसजी (ओएच) ७५०/जीटीआर सन - १९९८-९९

ए.टाईप कंडोमिनीयम नं-६, सेक्टर-९, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९

संदर्भ क्र.- साई/२५/३२ | दिनांक- १८/११/२५

## विशेष सर्वसाधारण पुनर्विकास सभा इतिवृत्तांत 16/11/2025

साई कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या . या संस्थेची विशेष पुनर्विकास सर्वसाधारण सभा दिनांक.16/11/2025 रोजी सकाळी 11.00 वा. कालिका माता मंदिर सेक्टर ०९, कोपर खैरने येथे घेण्यात आली.

**विशेष सर्वसाधारण सभेचा विषय संस्थेच्या पुनर्विकासासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्सी (PMC)**

**नियुक्ती करणे.**

सभा सकाळी 11.30 वाजता किमान गणसंख्या 62 सभासदांची उपस्थिती मिळाल्यानंतर चालू करण्यात आली.

1) सभेसाठी तात्पुरत्या अध्यक्षांची नेमणूक करणे –सचिव श्री. कुणाल मसणे यांनी श्री. निलेश चौधरी यांचे नाव सुचविले.

सूचक –श्री. कुणाला मसणे

अनुमोदन –श्री. महेंद्र पडवणकर

2) अध्यक्ष श्री. निलेश चौधरी यांनी सर्व सभासदांचे आभार मानले आणि PMC (प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट) यांबद्दल सर्व सभासदांना माहिती देण्यासाठी तसेच सर्व अटी शर्तींवर कुठल्या PMC या निवडण्यात आलेल्या आहेत, त्यात सर्वोत्तम कुठल्या आहेत हे, सांगण्यासाठी नियुक्त केलेल्या श्री. संजय जेम्से साहेबाना यांना सर्वांना समोर आमंत्रित केले.

3) श्री. संजय जेम्से यांनी सर्व PMC बद्दल माहिती दिली, सर्वोत्तम निवड केलेल्या 3 PMC यांची निवड का करण्यात आली आणि ज्या PMC ची निवड का करण्यात नाही आली, याची सविस्तर माहिती दिली व त्यावर सभासदांबरोबर चर्चा केली.

साईकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित नोंदणी क्रमांक: एनबीओएम/सिडको/एचएसजी (ओएच)/७५०/जेटीआर/सन १९९९ नवी मुंबई-४००७०९

मागे पहा...

4) सर्वोत्तम 3 PMC यांची निवड खालील प्रमाणे

* द फर्म

* फॅसिनेट आर्किटेक्ट

* अतुल पटेल आर्किटेक्ट

5) श्री. संजय जेम्से यांनी या 3 PMC पैकी कुठली PMC कुठल्या मापदंडावर महत्वाची आहे, तसेच त्यांच्या कंपनी प्रोफाईल कश्या आहेत, या बद्दल सर्व सभासदांना सविस्तर माहिती दिली, तसेच निविदा पत्रिकेत दिलेल्या अटी आणि शर्तीवर कुठली PMC ही सर्वोत्तम आहे,याची ही माहिती सर्वांसमोर मांडण्यात आली.

6) अध्यक्ष श्री. निलेश चौधरी यांनी संस्था कुठ कुठल्या मॉडेलनुसार काम करू शकते,तसेच संस्थेच्या सभासदांच्या हित कसे जोपासले जाईल याची माहिती व त्यावर चर्चा केली.

7) श्री. लक्ष्मण झोडगे यांनी PMC बद्दल माहिती दिली आणि सर्व सभासद तसेच संस्थेच्या समितीचे आभार मानले .

8) श्री. संदीप पावसकर यांनी पुनर्विकास समिती तसेच श्री. संजय जेम्से यांनी केलेल्या PMC ची पाहणी व निवड प्रक्रिया,याबदल आभार व्यक्त केले.

9) श्री. लहू माने यांनी PMC नि निविदांमध्ये त्यांकडून मागण्यात आलेला परतवा याची पुन्हा माहिती द्यावी असे, विचारणा करण्यात आली.यावर श्री. निलेश चौधरी आणि श्री. संजय जेम्से यांनी सविस्तर माहिती दिली.

10) सचिव श्री. कुणाल मसणे यांनी श्री. संजय जेम्से यांचे आभार मानले, व PMC निवड प्रक्रिया चालू करण्यासाठी सर्वांना वोटिंग पेपर्स कश्या प्रकारे निवड ही करायची आहे, याची सर्वांना माहिती दिली. यानंतर निवड प्रक्रिया चालु करण्यात आली.

11) सचिव श्री. कुणाल मसणे यांनी सर्वांना माहिती देत सांगितले की,65 सभासदांनी मतदान केले, त्या मतदानांपैकी 52 सभासदांनी द फर्म या PMC ला मतदान केले,12 मतदान हे अतुल पटेल आर्किटेक्ट यांना केले आणि 1 मतदान हे फॅसिनेट आर्किटेक्ट यांना करण्यात आलेले आहे.मिळालेल्या मतदानानुसार संस्थेच्या पुनर्विकासासाठी द फर्म या PMC (प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट) ची नेमणूक करण्यात आली.

अध्यक्ष श्री. निलेश चौधरी यांनी माहिती दिली की पुढील 7 दिवसांच्या आत द फर्म या PMC ला संस्थेकडून नियुक्ती पत्रक देण्यात येईल.

सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली, असे संबोधन करत सर्व सभासदांचे आभार मानून श्री. कुणाल मसणे यांनी सभेचा समारोप केला.

For SAIKRUPA CO-OP. HSG. SOCIETY

Masane

(SECRETARY)

साईकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
नोंदणी क्रमांक:
एनबीओएम/सिडको/
एचएसजी (ओएच)/ ३५०/
जेटीआर/ सन १९९१
नवी मुंबई-४००७०१